
## We are Proud of our Alumni!!

## आम्हांला आमच्या विद्यार्थ्यांचा सार्थ अभिमान आहे.








**Mr. Hemant S Kapile, Completed Diploma in Mechnaical Engineering from Batch 2015-16**
**MET's Institute of Technology-Polytechnic, Nashik and Owner of Friendverse Travels and Accommodation**

राज्य व केंद्र शासन, राज्याच्या व देशाच्या आर्थिक वृद्धीसाठी स्टार्ट अप्स सारख्या विविध योजनांच्या माध्यमातून, नव उद्योजकांना (Entrepreneurs) लघु व मध्यम उद्योगांच्या उभारणीसाठी सातत्याने प्रोत्साहन देत असते. देशाच्या औद्योगिक योजनेत (Industry Policies) देखील, त्या अनुषंगाने सकारात्मक बदल करून, नवउद्यमींना (यांत तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, विज्ञान व व्यावसायिक अभयसक्रमातील मनुष्य बळाचा समावेश ) स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरु करण्यासाठी, सुविधा व मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासाठी प्राधान्य देण्यात आले आहे.

"निर्मिती (Creativity) व नाविन्यता (Innovation) या गुणांच्या माध्यमातून, एखादी नवी गोष्ट करणे ,वा जुनीच गोष्ट नव्या चांगल्या पध्दतीने करत , सभोवतालच्या पर्यावरणाला दिलेला सकारात्मक प्रतिसाद म्हणजे , उद्योजगता (Entrepreneurship)" अशी उद्योजगतेची साधी सोपी व्याख्या आहे. उच्च तंत्रज्ञान, नाविन्यता व गुणवत्तापूर्ण उत्पादन निर्मिती या त्रिसूत्रीवर आधारित, नव्या उद्योग संस्कृतीनुसार, योग्य पद्धतीने उद्योगांची वाढ तसेच वस्तू सेवा यांची निर्यात साधने शक्य असून, त्यासाठी मोठ्या प्रमाणांत पदविका व पदवी अभियांत्रिकी शिक्षण घेतलेल्या अभियंत्यांना लघु व मध्यम उद्योग उभारणी संदर्भात माहिती देवून , उद्योजगतेसाठी लागणाऱ्या कौशल्यांचा अंतर्भाव अभ्यासक्रमांत करून , उद्योजगता विकास केंद्र (Entrepreneurship Development Cell) व Incubation Center स्थापण्यास प्राधान्य देणे, हे सद्यस्थितीत सर्वच अभियांत्रिकी महाविद्यालयांसाठी आवश्यक झाले आहे. तंत्रज्ञान , अभियांत्रिकी व विज्ञान शाखेतील मनुष्यबळाच्या बाबतीत, भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा देश असून, उत्तम अभियंते आपल्या शिक्षण कौशल्यांचा व अनुभवाचा योग्य उपयोग करून, आपल्या छोट्याशा उद्योगांची सुरुवात करू शकतात व कार्यकेंद्रीत (Action oriented), स्वयंप्रेरित (Self Motivated), निर्धारित ध्येयापर्यंत पोहोचण्यासाठी येणाऱ्या संकटांना सामोरे जाणे (Risk taking), तसेच स्वयंशिस्त पाळून इतरांना प्रोत्साहित करणे, व भविष्यवेधी धोरणे आखून त्यानुसार मार्गक्रमण करणे , यांसारख्या गुणांचा विकास साधत, चांगले उद्योजक बनू शकतात.

भारतात अभियांत्रिकी शाखेतील सर्वाधिक विद्यार्थी हे , मध्यम उत्पन्न गटांतील कुटुंबातून येत असल्याने, शिक्षण पूर्ण झाल्यानंतरचा, त्यांचं सरळ सोपा अग्रक्रम हा सरकारी वा खाजगी नोकरीच्या माध्यमातून, नियमित वेतन व स्थैर्य मिळवण्याकडे अधिक दिसून येतो. त्यामुळे,स्वकर्तृत्वावर, स्वकौशल्यातून , आत्मनिर्भरपणे स्वयंरोजगार वा स्वयंउद्योजगतेकडे वळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प असते. काही वर्षांपूर्वी, प्रशासनातील नोकरशाही व व्यवस्थापनातील करियरला मिळत असलेल्या समाज मान्यतेमुळेदेखील, विद्यार्थी व पालकांचा "पळत्याच्या मागे धावण्याच्या " वृत्तीतून अशा क्षेत्रांत जाण्याकडे अधिक कल होता. तथापि, सद्यस्थितीत बदलत्या जागतिक आर्थिक धोरणांमुळे, कुशल अभियंते स्वयं उद्योजगतेकडे (Self Employment) वळतानाचे सकारात्मक चित्र दिसत आहे.

श्री . ऋषिकेश गिरीश अहिरे, हा मेट पॉलीटेकनिकच्या, यंत्र अभियांत्रिकी विभागांतील, शैक्षणिक वर्षे २०१५-१६ मधील उत्तीर्ण विद्यार्थी. नेहमीच्या रुळलेल्या वाटेस नाकारून त्याने देखील, आपल्या शिक्षण कौशल्याचा योग्य वापर करून, स्वयं उद्योजक बनून आपल्या छोटयाशा उद्योगांची पायाभरणी करत, व्यावसायिक यशाच्या मार्गावर एक पाऊल टाकले आहे. कष्ट व मेहनतीची तयारी, आत्मविश्वास, व्यवहार ज्ञान आणि व्यावसायिक कौशल्य वाढविण्यासाठी विविध स्पर्धा व उपक्रमांतील उत्स्फूर्त सहभाग, ह्या गुणांमुळे, तसेच अंगीभूत निर्मिती व नावीन्यतापूर्ण दृष्टीकोनामुळे, त्याची पदविका व पदवी महाविद्यालयीन कारकीर्द, नेहमीच बहरलेली राहीली .मेकॅनिकल अभियांत्रिकी पदविकेच्या (Diploma) अंतिम वर्षात, त्याने आपल्या वर्गमित्रांसोबत निर्मिती व नावीन्यतेचा उपयोग करत "Underwater Remote Operated Vehicle" या प्रकल्पाची निर्मिती केली होती . या प्रकल्पाच्या सहाय्याने धरणं , जलतरण तलाव अशा लहान, मध्यम व मोठ्या जलाशयांतील जलसाठ्यांतील माती व विविध घटकांची तपासणी करणे शक्य असल्याने, त्याचा उपयोग सार्वजनिक जलाशयांकरिता करण्यासाठी उपयुक्त असल्याचे कौतुक, नाशिक शहराचे तत्कालीन महापालिका आयुक्त डॉ . प्रवीण गेडाम यांनी प्रत्यक्ष प्रकल्प पाहणीनंतर केले होते. डिप्लोमाला असतांनाच, उन्हाळी सुट्ट्यांमध्ये ऋषिकेशने, औद्योगिक प्रशिक्षण योजनेअंतर्गत, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेड (HAL) ओझर , नाशिक येथे प्रशिक्षण घेतले. तिथे त्याला "Design & Manufacturing of Fixture for Canpoy bracket of Sukhoi SU ३० MKI"या प्रकल्पावर तेथील तत्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळाली. अभ्यासाव्यतिरिक्त, विभागाच्या व संस्थेच्या सर्व उपक्रमांमध्ये हिरीरीने सहभाग घेत, त्याने विशेष प्राविण्यासह यंत्र अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम यशस्वीरीत्या पूर्ण केला. त्यानंतर, पदवी अभ्यासक्रमासाठी, पुणे विद्यापीठांतर्गत प्रवेश मिळवत , तेथेही अभियांत्रिकीच्या शेवटच्या वर्षांतील प्रकल्पांतर्गत त्याने व त्याच्या सहकाऱ्यांनी, तीन चाकी बग्गी बनवून महिंद्रा अँड महिंद्रा या नामांकित उद्योग समुहाच्या माध्यमातून, राष्ट्रीय पातळीवर आयोजित SAE BAJA स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत त्याने, त्याच्या टीम जेनेसिसच्या वतीने चालक व उपकर्णधार म्हणून प्रतिनिधित्व केले. त्यांनी या स्पर्धेत, ३ चाकी स्वयंचलित वाहनांची अभिकल्प (Design) पासून वाहनाच्या वेगवेगळ्या भागांची निर्मिती स्वतः करत, स्वयंपूर्ण असे Self Propelled वाहन, निर्धारित वेळेत व योजलेल्या उद्दिष्टांसह पूर्ण केले. या वाहनालाच, त्यावेळच्या राष्ट्रीय स्पर्धेत, उत्कृष्ठ अभिकल्पासाठीचे २.५ लाखांचे बक्षीस , सार्वत्रिक गटांतील विजेतेपदासह देण्यात आले होते .

स्वयंचलित वाहनांच्या अभिकल्प व निर्मिती प्रक्रियेतील रुचीमुळेच, त्याने पदवीनंतर आपले शिक्षण कौशल्य व अनुभवाचा वापर करत, स्वतःची Auto Care Taker (ACT) नावाची चार चाकी वाहनांची, स्वयंपूर्ण व अद्ययावत कार्यशाळा पिंपळगाव (बं ) येथे सुरु केली असून, त्यात Wheel Alignment , Balancing , Denting , Painting या अत्याधुनिक सुविधांसह, सर्व प्रकारची दुरुस्तीची कामं केली जातात. यांसोबतच त्याने, Friendverse Travels & Accomodation या व्यवसायाचीही उभारणी केली असून, त्याअंतर्गत ग्राहकांना आरामदायी सोयीयुक्त, सुरक्षित प्रवासाची सेवा उपलब्ध करून देण्यात, अल्पावधीतच यश मिळवले आहे.

ऋषिकेशचे वडील श्री. गिरीश अहेर हे नाशिक महापालिकेच्या गृह कर व जल निःस्सारण विभागातून, निवृत्त सहाय्यक अधीक्षक असून, आई सौ. कल्पना ह्या भारतीय जीवन बिमा निगम (LIC ) मध्ये कार्यरत आहे. लहान भाऊ अभिषेक हा, संगणक अभियांत्रिकी मध्ये शिक्षण घेत आहे. अशा शैक्षणिक कौटूंबिक पार्शवभूमीतून मिळालेल्या वैयक्तिक स्वातंत्र्यामुळे, त्याला आपल्या आवडत्या क्षेत्रांत काम करण्यासाठी सतत प्रोत्साहनच मिळाले व त्यानेही या स्वातंत्र्याचा सदुपयोग करत, आपल्या व्यावसायिक कारकिर्दीला गांभीर्याने सुरुवात केली.

आपल्या व्यावसायिक कारकिर्दीच्या प्राथमिक टप्प्यावर असणाऱ्या पदविका व पदवीच्या विद्यार्थ्यांना, त्याचे आवर्जून सांगणे आहे की , "स्वतंत्रपणे, स्वबळावर ,नवीन विशेष , काहीतरी करण्याची इच्छा, तसेच स्वकौशल्याचा वापर करत, उत्तम आर्थिक मोबदला मिळवून, स्वतःला सिध्द करायचे असल्यास ,स्वयंउद्योजगतेचा मार्ग तुम्हाला खुणावतोय. या मार्गावर मार्गक्रमण करतांना , कष्ट करण्याची तयारी ठेवा, अपयशाला धैर्याने सामोरे जा, सतत नवीन शिकण्याची तयारी ठेवा, यश तुमचेच असेल. त्यासाठी वेगळं काहीतरी करण्याची आवश्यकता नसून, माझ्या प्रमाणेच तुम्ही ज्या संस्थेत शिकत आहात , तेथे मन लावून अभ्यास करत, extra curricular activities मध्ये सहभागी होत, सातत्याने तांत्रिक ज्ञान व कौशल्य अद्ययावत करत राहा. "

गुणवत्ता भान (Quality Consciousness), आधुनिक तंत्रज्ञांनाचा वापर व स्वीकार (Adaption of Modern Technology), उत्तम व्यवस्थापन कौशल्ये (Management Techniques), संशोधन व नाविन्यता यांच्या उपयुक्ततेची जाणीव (Realization of importance of Research & Innovation) ह्या वैशिष्ट्यांच्या बळावर , ऋषिकेश हा एक उत्तम तांत्रिक उद्योजक (Technical Entreprenure) बनून, आपल्या निर्धारित ध्येयापर्यंत पोहोचण्यात नक्कीच यशस्वी होईल याची खात्री आहे. त्याला त्याच्या भावी व्यावसायिक वाटचालीसाठी, मनःपूर्वक शुभेच्छा !!!

**अमोल पुरुषोत्तम वडनेरे**
विभागप्रमुख-यंत्र अभियांत्रिकी विभाग
मेट पॉलीटेकनिक-भुजबळ नॉलेज सिटी, नाशिक.